
# माझें विद्यापीठ

## नारायण सुर्वे

१९६६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७२५०




REFBK-0015565
REFBK-0015565

१९६६ 1304

३१५० ७५०६०/१६।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७५०६० वि: ...
क्रमांक १९५० नों. दि: १६/३/७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
* १९७० *

# माझें विद्यापीठ

# माझें विद्यापीठ

REFBK-0015565
REFBK-0015565

नारायण सुर्वे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९५५६५
ग्रं. क्र.

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© नारायण सुर्वे, १९६६

पहिली आवृत्ती
सप्टेंबर १९६६/१८८८

मुद्रक : कृष्णा शंकर करवार, मोहन मुद्रणालय, ॲक्मे इस्टेट, शिवडी बंदर रोड, शिवडी (पूर्व), मुंबई १५ डीडी □ प्रकाशक : गणेश रामराव भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४ डब्ल्यू बी

सौ० शिरीष पै
ह्यांना –

# आभार

'ऐसा गा मी ब्रह्म !' नंतरचा हा माझा दुसरा काव्यसंग्रह.

ह्यांतील संगृहीत कविता सर्व कांहीं बोलेल. तिला स्वतःचा अनुभव आहेच. भाषाही आहे. मग माझें पांगळें 'निमित्त' कशाला ?

पॉप्युलर प्रकाशनाचे श्री. रामदास भटकळ ह्यांचा मी आभारी आहे. त्यांचे आपलेपण म्हणजेच हा काव्यसंग्रह.

मौज, सत्यकथा, मराठा, मांडवी, वीणा, युगांतर, भारूड इत्यादि नियतकालिकांच्या संपादकांनीं कविता संग्रहात समाविष्ट करूं दिल्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

९२/३६, म्युनि. चाळ
जेरबाई वाडिया रोड
परळ, मुंबई १२

नारायण सुर्वे

यंत्राच्या काळजांतील आर्त स्वर
तुझ्या कंठात आकार घेऊं दे
उडणाऱ्या नाडीचे जागते ठोके
त्यांचा घंटारव अंतरांत घुमूं दे

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| माझें विद्यापीठ | ... | १३ |
| सत्य | ... | १७ |
| नेहरू गेले त्यावेळची गोष्ट | ... | १९ |
| एक आम्हींच असें निघालो | ... | २० |
| हुजरे | ... | २१ |
| विचार | ... | २२ |
| घंटा | ... | २३ |
| आम्हीं आहोंत | ... | २४ |
| उगीचच— | ... | २५ |
| —पाणी घे | ... | २६ |
| स्वतःलाच रचीत गेलों | ... | २८ |
| नाळ | ... | २९ |
| बरं कां रे पोरा | ... | ३० |
| गाणें | ... | ३२ |
| असा कसा दगड झालों | ... | ३३ |
| मुंबई | ... | ३४ |
| पानें सळसळतात तेव्हां | ... | ३८ |
| हुन्नरी | ... | ३९ |
| बेअब्रू खूपच झाली | ... | ४० |
| जर तुम्हांला | ... | ४१ |
| धीर | ... | ४० |
| कांहीं ओळी | ... | ४३ |
| बेतून दिलेलें आयुष्य— | ... | ४४ |
| तेव्हां एक कर ! | ... | ४५ |
| कठीण होत आहे | ... | ४६ |
| दगड | ... | ४७ |
| नायक | ... | ४८ |

| | | |
|---|---|---|
| सावध | ... | ५० |
| पावसाळा | ... | ५१ |
| कर्जपुत्र | ... | ५२ |
| विश्वास ठेव | ... | ५३ |
| विझतां विझतां स्वतःला | ... | ५४ |
| बोल | ... | ५५ |
| लालबाग | ... | ५६ |
| माणूस | ... | ५७ |
| माझे शब्द | ... | ५८ |
| सांग | ... | ५९ |
| ऊठ | ... | ६० |
| असेल–नसेल | ... | ६१ |
| पोष्टर | ... | ६२ |

# माझें विद्यापीठ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५६५

ना घर होतें, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती
दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती.

अशा देण्यांत आलेल्या उठवळ आयुष्याची ऊठबस करतां करतां...
टोपलीखाली माझ्यासह जग झाकीत दररोज अंधार येत जात होता.

मोजलेत सर्व खांब ह्या रस्त्यांचे, वाचली पाट्यांवरची बाराखडी
व्यवहाराच्या बजाबाकींत पाहिलेत; हातचे राखून कित्येक मारलेले गडी.

हे जातीजातीत वाटलेले वाडे, वस्त्या, दारावरचे तांबडे नंबरी दिवे
सायंकाळी मध्यभागी असलेल्या चिडीयाघराभोवती घोटाळणारे गोंगाटांचे थवे.

अशा तांबलेल्या, भाकरीसाठी करपलेल्या, उदास वांदेवाडीच्या वस्तीत
टांगे येत होते, घोडे लोळण घेत होते, उभा होतो नालीचा खोका सांभाळीत.

' ले, पकड रस्सी–हां–खेच, डरता है ? क्या बम्मनका बेटा है रे तू साले
मजदूर है अपन; पकड घोडे को; हां; यह, वाह रे मेरे छोटे नालवाले."

याकुब नालबंदवाला हसे, गडगडे. पत्रीवाला घोडा धूळ झटकीत उभा होई
"अपनेको कालाकांडी. तेरेको जलेबी खा." म्हणत दुसरा अश्व लोळवला जाई.

याकुब मेला दंग्यांत, नव्हतें नातें; तरीही माझ्या डोळ्याचें पाणी खळलें नाही
उचललें प्रेत तेव्हा ' मिलाद-कलमा 'च्या गजरांत मिसळल्याशिवाय राहिलों नाही

त्याच दिवशीं मनाच्या एका कोऱ्या पानावर लिहिलें, " हे, नारायणा
अशा नंग्यांच्या दुनियेंत चालायची वाट; लक्षांत ठेव सगळ्या खाणाखुणा."

भेटला हरेक रंगात माणूस, पिता, मित्र, कधी नागवणारा होऊन
रटरटत्या उन्हाच्या डांबरी तव्यावर घेतलेत पायाचे तळवे होरपळवून
तरी कां कोण जाणे ! माणसाइतका समर्थ सृजनात्मा मला भेटलाच नाही
आयुष्य-पोथीचीं उलटलीं सदतीस पानें; वाटतें, अजून कांही पाहिलेंच नाही,
नाही सापडला खरा माणूस; मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलों ?
सदतीस जिने चढून उतरतांना, मीही नाही का ? कैकदा गोंधळून झापडलों ?
आयुष्य दिसायला पुस्तकाच्या कव्हरासारखें गोंडस, गुटगुटीत, बाळसेदार.
आत : खाटकाने हारीने मांडावींत सोललेलीं धडें, असे ओळीवर टांगलेले उच्चार
जीवनाचा अर्थ दरेक सांगीत मिटवीत जातो स्वतःला स्वतःच्याच कोशात
पेन्शनरासारखा स्मृती उजाळीत उगीचच हिंडतो कधी वाळूत कधी रामबागेत
हें सगळें पाहून आजही वाटतें; "हे नारायणा, आपण कसे हेलकावतच राहिलों"
चुकचुकतो कधी जीव; वाटतें, ह्या युगाच्या हातून नाहकच मारले गेलों.
थोडासा रक्ताला हुकूम करायचा होता, कां आवरला म्यानावरचा हात,
कां नाही घेतलें झोकवून स्वतःला, जसें झोकतो फायरमन फावडें इंजिनांत
विचार करतों गतगोष्टींचा, काजळी कुरतडीत जणू जळत रहावा दिवा एक
उध्वस्त नगरांत काहीसें हरवलेलें शोधीत हिंडावा परतलेला सैनिक

किती वाचलेत चेहरे, किती अक्षरांचा अर्थ उतरला मनात
इथे सत्य एक अनुभव. बाकी हजार ग्रंथराज कोलमडून कोसळतात.

खूप सोयरीक करतों आता ग्रंथांची; वाटतें तेही आपणासारखेच बाटगे निघाले
हवे होते थोडे परिचारिकेसम, कामगारसम निर्मितीक्षम, पण दुबळेच निघाले

जगतांना फक्त थोड्याशाच शब्दांवर निभावतें; मरतांना तेही बापडे दडतील
स्ट्रेचर धरून पोशाखी शब्द रुख्या मनाने आमची तिरडी उचलतील

वाढलें म्हणतात पृथ्वीचें वय, संस्कृतीचेंही. फक्त वयेंच वाढत गेलीं सर्वांचीं
छान झालें; आम्हीही वाढतों आहोंत नकाशावर. गफलत खपवीत जुळाऱ्यांची.

ह्या कथा : कढ आलेल्या भाताने अलगद झाकण उचलावें तशा उचलतात
रात्रभर उबळणाऱ्या अस्थम्यासारख्या अख्खा जीव हलक करून सोडतात.

कळलें नाही : तेव्हा याकुब कां मेला ? कां मणामणाच्या खोड्यांत आफ्रिकन कोंडला
का चंद्राच्या पुढ्यातला एकुलता पोर युद्धाच्या गिधाडाने अलगद उचलला ?

चंद्रा नायकीण; शेजारीण. केसात कापसाचे पुंजके माळुन घराकडे परतणारी
पंखे काढलेल्या केसावरून कापसाखळीची सोनसरी झुलपावरून झुलणारी

अनपढ. रोजच विकत घेई पेपर, रोजच कंदिलाच्या उजेडांत वाचायची सक्ती होई
" खडे आसारे माझो झील; ह्या मेरेर का त्या रे " भक्तिभावाने विचारीत जाई

कितीतरी नकाशांचे कपटे कापून ठेवले होते तिनें; जगाचा भूगोलच होता जवळ
भिरभिरायची स्टेशनांच्या फलाटावरून, बराकीवरून, मलाच कुशीत ओढी जवळ

मेली ती; आता अश्रूंचे दगड झालेत. चटके शांतवून कोडगें झाले आहे मन
बसतों त्यांच्या पायरीवर जाऊन, जसें ऊन. उठतांना उठवत नाही नातीं तोडून.

निळ्या छताखाली नांगरून ठेवल्या होत्या साहेबांच्या बोटी
दुखत होत्या खलाशांच्या माल चढवून उतरून पाठी
वरून शिव्यांचा कचकोल उडे, " सुव्वर, इंडियन, काले कुत्ते "
हसता हसता रुंद होत गोऱ्या मडमांच्या तोंडाचे खलबत्ते
आफ्रिकी चाचा चिडे, थुंके, म्हणे; " काम नही करेगा. "
चिलमीवर काडी पेटवीत मी विचारीं " चाचा, पेट कैसा भरेगा ? "
धुसफुसे तो, पोटऱ्या ताठ होत, भराभरा भरी रेलच्या वाघिणी
एक दिवस काय झालें; त्याच्या डोळ्यांत पेटलें विद्रोहाचें पाणी
टरकावलें घामेजलें खमीस, त्याचा क्रेनवर बावटा फडफडला
अडकावून तिथेच देह माझा गुरू पहिले वाक्य बोलला,
" हमारा खून झिंदाबाद ! " वाटलें, चाचाने उलथलाच पृथ्वीगोल
खळाळल्या नसानसांत लाटा, कानांनी झेलले उत्थानाचे बोल
अडकवून साखळदंडांत सिंह सोजीरांनी बोटीवर चढवला
" बेटा ! " गदगदला कंठ. एक अश्रू खमीसावर तुटून पडला
कुठे असेल माझा गुरू, कोणत्या खंदकांत, कां ? बंडवाला बंदीशाळेंत
अजून आठवतो आफ्रिकन चाचाचा पाठीवरून फिरलेला हात
आता आलोंच आहे जगांत, वावरतों आहें ह्या उघड्यानागड्या वास्तवांत
जगायलाच हवें; आपलेंसें करायलाच हवें; कधी दोन घेत; कधी दोन देत.

# सत्य

तुझे गरम ओठ : ओठावर टेकलेस तेव्हा,
तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी.
पलिकडे खडखडणारें कारखाने
खोल्याखोल्यांतुन अंथरले बिछाने
मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर
काटे ओलांडीत चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने.

तुझे गरम ओठ : खडीसाखर होत गेले तेव्हा
तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ.
खपत होतों घरासाठीच...
विसावत होतों शीण तुझ्या कांठावर
तुझ्या खांद्यावर–
तटतटलीस उरींपोटीं
तनु मोहरली गोमटी
एक कौतुक धडपडत आलें; घरभरलें.
हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी.
वाकलीस खणानारळांनी.

तुझे गरम ओठ : अधिकच पेटत गेले तेव्हा,
तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन
पंखाखाली बसलीस चार पिलें ठेवून
कोनाडा हळहळला–कळवळला.

‘ नारायणा ’ – गद्‌गद्‌ला.
‘ शिंक्यावरची भाकर घे ’ – पुटपुटला.
‘ उद्यांपासुन तिलाही काम बघ बाबा. ’
गांगरलों, भोवंडून स्थीर झालों.
तिच्या ओठावर ओठ टेकवून
बिछान्यासह बाहेर पडलों. त्या रात्रीं,
लिचे ओठ अधिकच रसाळ वाटले. अधिकच...

# नेहरू गेले त्यावेळची गोष्ट

पाठी शेकवित बसलेलीं घरें कलकललीं
शहर कसें करडें होत गेलें
नंतर अंजीरी
पुढें...काळोखानें माणिक गिळलें.

दगडी गाऊन घातलेले कारखाने
चिरूट शिलगावीत
विचारांत बुडाले.

नंतर...
ओलेंच खमीस खांद्यावर टाकुन
खुराड्याकडे वळले.

'क्या हुआ ए सुंद्रे...!'
—'आज लोबन मत जला!... नेहरू गये!!'
'सच; तो चलो आज छुट्टी!...'
शीण पेलणारे जग खाटेवर कललें.

मी उदास खिन्न होऊन चाललों
रस्ते कसे भयाण वाटले
कागदी खोलींत उजेड घेऊन चाललेला हातगाडीवाला.
मी विचारलें,
'हा प्रकाश आतां कशाला नेतो आहेस!'
'वा राव;
पुढें काळोख दांत विचकीत असेल!'
नेहरू गेले त्यावेळची गोष्ट!

# एक आम्हींच असे निघालो—

दर वळणावर आम्ही नवे मुक्काम करीत गेलो
एकाच जागीं स्थिरावणें आम्हाला जमलेंच नाहीं.

जोडलेलें घर सोडतांना ताकमेढ हळहळली
आम्हीही पाणावलों; उंबऱ्यात अडखळलो नाहीं.

स्वतःलाच शोधण्यात अर्धी उमर हरवुन गेलो
स्वतःकडुन लाखदा वळलो; तरीही आढळलो नाहीं.

असे आम्हीं पुरे भणंग, झांजरवेळीं वळतांना...
बसावेसें वाटलें, बसलो. उठताच; बसलो नाहीं.

प्रत्येक रात्र आत्म्याशीं चर्चा करण्यांत घालविली
एक आम्हींच असे निघालो; बेईमान झालो नाहीं.

# हुजरे

शहर तापते तेव्हां समर्थ शब्द शेकवला जातो
ओठाओठावर ओवला जातो
पुढच्या पिढ्यांचा उच्चार होतो;
गोंडा घोळणारे शब्द पुन्हा त्याचे हुजरे होतात
दारावर पाळ्या लावुन शास्त्रें सांगतात
त्याची वाट विचारीत येणाराला अडवतात—

असे साय पांघरलेले शब्द
दररोज मला भेटतात
ग्रंथाग्रंथातुन......

वा. क. १५५६५

# विचार

कधीं विचार असे येतात,
जसे थकुन यावेत तिसऱ्या पाळीचे कामगार घरांत
कुदळ घालुन रस्ता खोदणारे शब्द
चिंब भिजुन निथळत सावलींत दमुन बसतात
अशावेळीं मला तुझे भारलेले हात हवेत.

कधीं विचार असे वागतात,
मळणीच्या खुंटाभोतीं रवंथ करीत संथ फिरतात
मध्यरात्रीस चिमणीच्या उजेडांत
जीवनाचा अर्थ शोधीत कार्यकर्ते भांडत बसतात
अशावेळीं सावरणारे तुझे मला हात हवेत.

कधीं विचार असे होतात,
क्षितीज तोलीत, पंख आवरून कारखान्यावर कबुतरें बसतात
भूगर्भांतील खोल धुवांधार काळोखांत
घट्टेवाले ! कंदिल धरून कोलारच्या खाणी रापतात
अशावेळीं तुझे मला छत्ररूपी हात हवेत.

# घंटा

हे अखेरचे शब्द तिचे; ' जाते रे '
डागीत गेलेले
वॉर्डमधील अंधार अधिकच गडद झालेला

तिचें शव माझ्या पुढ्यांत आहे
एक उघडा डोळा; माझ्यावर रोखलेला
दुसरा मिटलेला; तिच्या मालकीचा
विझतांनाहि श्वास पेरून गेली

दूरवर चर्चच्या घंटा घणघणताहेत

## आम्हीं आहोंत –

आत्मा : जो प्रत्येकानें दिवसभर तळघरांत कोंडलेला असतो
भूमिगतासारखा
मी त्याच्याशीं रोज बोलतो
कधीं, दोघें बाहेरहि फिरतों
पण—
पलिकडच्या फुटपाथवर
खांबाला टेकून पाळत करणारा बुटका उजेड
मडकींत विझल्यावर
केव्हां—केव्हां;
त्यालाहि गुंगारा देऊन—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५०७० वि. काव्य
१८५० नोंद दि. १६/३/७९

# उगीचच–

उगीचच जोडलीं बायकोपोरें–
सगेसोयरे
उगीचच कुडुन घेतलें
एक घर–जन्मभर
सर्व वाटा उंबरठ्यात
विसर्जित केल्या
उगीचच !
हेंही उगीचच.

## —पाणी घे

—खालीं......
खिडक्यातुन विटका प्रकाश, त्याखालीं...
आवरतो टांगेवाला. उतरे
अलबेला, छेलछबेला.
खुडबुडती खोकीं क्षणभर
उडती स्वर —
' आयी मिलनकी बेला. '

' चंद्रे ! पाणी घे लवकर —
दिल लगाके प्यार कर,
सरग नजदीक कर,
छोकरे !...

चुडीयाँ...पाजामे लखनौके
चाय गरम
चल ला पैसे बदमाश
क्या करता है रे धरम

' आगबोटवाला आला वर
इंदे ! पाणी घे लवकर —
किती दिसानी आला इंदीचा राजा
आहा रे, राजा !...
ढोलमढोल; बेंडबाजा !
करीत असल दुसऱ्या खिडकीचा पडदा वर
चल रे सैंया उधर... '

नवाच दिसतो रे तू पोपट माझा
मी राणी आणि तूं माझा बाजा
परत कधी येणार तूं प्राणप्रिया रे
छुपके छुपके,
कन्हैया बाँके.
चिमणे! पाणी घे लवकर...!

# स्वतःलाच रचीत गेलों

आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलों नाहीं
उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेंच नाहीं

पैगंबर खूप भेटलेत; हेंहि कांहीं खोटें नाहीं
स्वतःलाहि उगीचच हात जोडतांना पाहिलें नाहीं

वावरलों हरेकांत, हरेकांना दिसूं आलोंच नाहीं
आम्हीं असे कसे ? असा प्रश्न स्वतःलाहि केला नाहीं

कळप करून ब्रह्मांडात हंबरत हिंडलो नाहीं
स्वतःलाच रचीत गेलों; ही संवय गेलीच नाहीं

# नाळ

दुःखादुःखांतील तरतमभाव पाळला
दर खेपेस असें जगणें कठीण गेलें
हमेशाच जमवून घेणें कठीण गेलें
म्हणून म्हटलें; एकदाची कापावी नाळ
म्हणतां, म्हणतां कैक ऋतू उडून गेले.

# बरं कां रे पोरा !

बाप सांगतच होता......
ऐकत होतो आम्हीं सर्वजण; घरांतील
चाळींतील; उद्याच्या जगांतील !
चाळीसमोरच्या खाचरांतील पाणी नहात होतें प्रकाशपुरांत
" हां-तर पुढें होतों मी समुद्र घेऊन माणसांचा
बरं कां रे पोरा; पुढें निघालों,
चाळीकडुन वळलों; तेव्हां उभी होती दारांत
उगीचच मोहरलों मनांत
चाळकरी कुजबुजले आपसांत...
' तो बघा आत्म्याचा बापुस–फुडारी. '
बरं कां रे पोरा—
" वाढत गेलों–महासागर झालों.
आकाशाला रुपलों
बरं कां रे पोरा, कळसांना खुपलों.
तारा आल्या इंग्लंडांतुन
गेले म्हणतात तेव्हां राणीचे कळस कलंडुन
एक रक्त ओघळ लवलवत गेला अंधारावरून
करकचुन आवळावें पोतें; अशा गाडींतून
आम्हीं कैकजण—
पुन्हां आपल्याच चाळीच्या दारावरून...
बरं कां रे पोरा...

निजला होतास आईच्या कडेवर पदर पांघरून
मीही हात हलवला तेव्हां तिचा नूर...
ह्या मे दिनाच्या आठवणीनें येतो ऊर भरून—
बरं कां रे पोरा!...
बरं कां रे पोरा!!...

# गाणें

—छानसें घरकुल नांदतें गुलमोहोराखालीं
केवळ कांकणें किणकिणलीं असती.
रोजच आला असता चंद्र खिडकींत
नक्षत्रांपलिकडची एक दुनिया असती.

भरल्या पोटानें अगा पाहातो जर चंद्र
आम्हीही कुणाची याद केली असती.

# असा कसा दगड झालों....

असा कसा दगड झालों...
बाप असून काळ वाटलों त्यांना,
कशी चिडीचीप होऊन समोर
थरथरली पंखांत
हात जोडीत; टीपें गाळीत
' नाहीं...नाहीं. ' चा पुकारा करीत

असा कसा दगड झालों
पिशाच्च झालों
तडाखे हाणीतच राहिलों
कळवळली...किंचाळली...धप्पकन्...
तेव्हांच थांबलों.
असा कठोर झालों.

असा कसा दगड झालों...
दगड झाले डोळे
विसरलो पोटचे गोळे.
' पोरं पोसतां येत नाहींत तर बाप कशाला झालात. '
शब्द कोसळले.
माझ्याकडेच दया मागणारे माझेच चिमुकले हात
भाविक भोळे !
असा कसा दगड झालों;
दगडच झालों !

# मुंबई

पटकुर खांद्यावर टाकुन, सह्याद्रि घाट उतरून
माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन
केव्हां येई केव्हां निघून जाई, ठाऊक जन्मदात्रीला
पोक आलेल्या म्हाताऱ्या घरांत एका रात्रीं माझा जन्म झाला
पगाराच्या दिवशीं पिसाट होऊन आदळत घुसायचा घरांत
आई भीतीने अंग चोरून उभी राह्यची बिचारी कोपऱ्यांत
मला जवळ घेई, उंच झोकी, झिंजोट्या पिंजारून हंसे
केव्हां तरी माझ्याही गालावर पांच बोटांचे उमटत ठसे
आम्हांवर भारी लोभ; एक दिवसही केला नाही खाडा
हे नगरी ! तुझ्या सेवेंत चुकला नाहीं तिसाचा पाढा.
कळूं आले तेव्हांपासुन डबा घेऊन साच्यावर गेलों
घडवतो लोहार हातोड्याला तसाच घडवला गेलों
शिकलों तार कशी लावावी बावीण कशी भरावी धोट्यात
वेळ आलीच तर हक्कासाठीं केव्हां करावी आऱ्या खात्यांत
इथेंच; या सागरतीरीं झुंजतच त्यानेंही देह ठेवला
त्याच्याच साच्यावर दमेकरी मुकादमानें मला नेमला.

उनाड पोरानें कलंडावी दौत तसा हा निळा सागर
आठवुन तेव्हांच्या स्मृति माझ्यांतील ढसढसतो पोर
तुकतुकीत काळ्या पोटरीचे स्नायु उतरीत होते माल
फळीवर पडणाऱ्या पावलांचा पाण्यांतच ऐकत होतो ताल
ऐकुन अजान; फणसासारखे अंगावर फुटत कांटे
भीति वाटे मुल्लाची, फकीराची, पळे आठवुन घरचे रपाटे
तोच मी, तेच आम्ही, ह्या तुझ्या वास्तुशिल्पाचे शिल्पकार
तुझ्या सौंदर्यांत हे नगरी ! दिसोंदिस घालीत असतो भर
नरकासम चाळींत राहुनच स्वच्छ करतो तुझे रस्ते
उठवले जातों कधीं, दंडुकेवाले जसे उठवतात फिरस्ते
पुन्हा उचलतो संसार थाटतो दुज्या बाजूच्या खाचरात
जगत आहोत ह्या संस्कृतीच्या सडत आलेल्या वारशात
असे आम्ही लक्षावधी नारीनर दिवस असेतों वावरतो
राबता, खपता आयुष्य मेणबत्तीसम विझवुन घेतो.

हिंडतो तुझ्या हाटांतुन, गल्लींतुन, चौका चौकांतुन
नागरिक म्हणुन, संसारी बनुन, कधी बेकार गणुन
ह्या वाटा प्रकाश माळुन चंद्रास्तापर्यंत मांडतात उत्सव
दुतर्फा ह्यांच्या कांठावर उभे तुझ्या दोन्ही जगाचे वैभव
हे चाललेले माणसांचे जथे; कोणिकडुन कोणीकडे ?
मीही त्यांतील एक मुशाफिर; वाट कोणिकडुन कोणिकडे ?
दोनच ठाऊक वाटा; त्यांतील एक कारखान्याची वाट
दुजी, 'आवळा रे तिरडी ! म्हणा उडाला पंछी अनंतात !'
ह्या क्षणीं मनाच्या धर्मशाळेंत जमलेत सोबतीचे प्रवाशी
लिही आम्हावर म्हणत रांग लाऊन उभे हृदयाच्या दाराशीं
मित्रहो ! तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृतअक्षर
माझ्यावर, ह्या शहरावर तुमचेच हरघडी संस्कार
कसे तुम्ही; काय वर्णू थोरवी ! तुम्ही पोलाद, तुम्ही अलवार
फुले टपकन पडताच; जखमा होतात हृदयावर
हीं माणसें एकलेपणात सोबत करून धीर देतात
जसे तुझ्या किनाऱ्यावरचे दिवे ताऱ्यांसोबत मिणमिणतात.

सणासुदींत फिरवतो मुलांना खांद्यावर गर्दीच्या सोहळ्यात
ताटव्यांनीं फुलतो राजपथ माझीही कृष्णफुलें खिदळतात
उडवित फुगे नकळत येऊन फिरे माझेही बालपण
पुढें पिता चाले...आई मागुन धांवे ठेंचाळत गर्दीतून
गालांतच हंसतो मी; तितक्यांतच मुलें सवाल करतात
' बाबा—ह्या दगडाच्या भींती पोलीस इथे पहारे का हो देतात ?'
ऐकुन सवाल पेटतो मी, छातीवर कोसळती सहस्र घण
गळा भरून येतो. वाटते आताच अणुसम फुटेल प्राण
सावध चालती पाय; जसे वाघुट आठवुन चालावेत भोई
मुका होतो मी, सांभाळुन आणतो घरी माझ्या आयुष्याची कमाई
त्या रात्री. पापण्या मिटत नाहींत. काळोख कोरीत जीव जळत राहतो
चुलाण्यात फटफटावे लाकुड तसा आत्मा चरफडू लागतो.

झिजला चंदनासम बाप; मीही तसाच, अन् हे माझे कळे ?
अशाच त्यांनाही उदास रात्रीं, सोबतीस काळोखाचें गार वेटोळें

ओसंडु पहातो आहे हृदयघट; सांग कुठे करूं रिता
घडवुन गेला माझा बाप तुजसम स्फूर्तिशाली कविता.

## पानें सळसळतात तेव्हां

उदास काळोखांत पानें
सळसळतात तेव्हां
कदाचित् तूं आतां
कूस बदलत असशील
कदाचित् तूं आतां
उठलीच असशील.

उदास काळोखांत पानें
सळसळतात तेव्हां
कदाचित् बाळअंगाखालील चिरगुटें
बदलत असशील
कदाचित् कापल्या ओलीवर
अश्रु टपटपत असतील.

# हुन्नरी

—तर हे असे हरहुन्नरी लोक
शब्द गिरवणारेही त्यांत;
शब्द वितळवल्याची घोषणा करतात
तेव्हां हंसू येतें; वाटतें,
उभ्या उमरीत त्यांना एवढेंच जमलें
शब्द जगवताही आला नाहीं
जगताही आलें नाहीं.

# बेअब्रु खूपच झाली

बेअब्रु खूपच झाली अब्रुदारांच्या जगांत
प्रत्येक पत-पेढीवर आमची चर्चा निघेल
तरी आम्हीं जगतो; असा लौकिक बाजारांत
त्यांच्या नांवासोबतच आमचेंहि नांव निघेल

हृदय नेउन दाखवावे कोणत्याहि घरांत
बंद दारादारांतुन आमची कहाणी कळेल
किती मोजलेत तारे दुपारच्या अंधारांत
कितीदां तापला तवा त्याचेकडून कळेल

वेदना उरांत जपुन वावरतो जगांत
केंव्हांतरी जखमांना कायमचा दवा मिळेल
बेकार फिरतो चंद्र रात्रंदिन आकाशांत
कधींतरी त्यालाहि स्वतःचा प्रकाश मिळेल

बेअब्रु खूपच झाली; अब्रुदारांच्या जगांत
तरी त्याच्या घरासमीप माझेंही घर मिळेल

## जर तुम्हांला–

जर तुम्हांला छावणींत आढळलों नाहीं
खुशाल समजा,
अश्वशाळेंतले सात घोडे उडाले असतील
शिकलगारखान्यात सात तलवारी कमी भरतील.
खुशाल समजा,
नगारखान्यावर पडघम झडत असेल
अर्धें अंधारानें अडवलेलें बिंब वर सरकत असेल.
खुशाल समजेन,
मजमागुन, अजस्त्र लाटा धडकाव्यात तशा—
अक्षौहिणी आपली सेना धूळ उडवित असेल.
त्याहीमागें—
कोंडवाड्यांत कोंडलेला आपला सोनेरी देश
पानांफुलांनीं ही पालखी सजवित असेल.
खळखळत फुटत राहील हास्य झुंडींचे
नुकतीच सर झडावी अशा आपलेपणाचे
—आणि नगराभोंवतीं लक्ष कबुतरांचा थवा घुमत असेल.

जर तुम्हाला छावणीत आढळलों नाहीं
खुशाल समजा,
आपल्या अस्तीत्वासाठीं सर्व वाटा रोखुन धरल्या असतील
एके दिवशीं कफन बांधुन खड्गपातीं सरकत असतील.

# धीर

थांब ! पहाट झाली नाहीं
दिवे मालवुन कसे चालेल ?
तूं थकला असशील तर
माझी देहवात पेटवुन ठेव
धूसर धुक्यांतील जगांत
हातांत हात घेतले आपण
तूं म्हणालास गोंधळेन तेव्हां,
तुझा हात हृदयावर ठेव !

असा समीप ये, आणि—
सगळें, सगळें सांगुन टाक
माझ्या हृदयाजवळ केसांची
झुलपें झुलवीत ठेव
बुडत्या गलबतासम
हतबल; उदासूं नकोस,
किनाऱ्यावर उतरतात ओझीं
तसा शीण उतरून ठेव !

असेच एकमेकां सावरीत
जगायचें आहे जगांत
जेव्हां मी तडफडेन;
माझा आत्मा तुझ्या कुडींत ठेव !

# कांहीं ओळी

अजुन मरहाटी खाटीक
घेऊन फिरती रणगाडे
संगीनीच्या छायेखाली मज
सांगतात गावया पवाडे
रसवंती तयांना विकेन
तर मी गुन्हेगार ठरेन.

## बेतून दिलेलें आयुष्य—

बेतून दिलेलें आयुष्य; जन्मलों तेव्हां—
प्रकाशहि तसाच बेतलेला
बेतलेलेंच बोलणें बोललों. कुरकुरत
बेतलेल्याच रस्त्यानें चाललों; परतलों
बेतल्या खोलींत; बेतलेलेंच जगलों
म्हणतात ! बेतलेल्याच रस्त्यानें गेलांत तर
स्वर्ग मिळेल. बेतलेल्याच चार खांबात
थू :

# तेव्हां एक कर !

जेव्हां मी या अस्तित्वाच्या पोकळींत नसेन
तेव्हां एक कर
तूं निःशंक मनानें डोळे पूस
ठीकच आहे, चार दिवस धपापेल जीव गदगदेल !
उतूं जाणारे हुंदके आवर
कढ आवर, नवे हिरवे चुडे भर
उगीचच चिरवेदनेच्या नादीं लागूं नको !
खुशाल; खुशाल तुला आवडेल असें एक नवें घर कर
मला स्मरून कर,
हवें तर; मला विस्मरून कर !

# कठीण होत आहे

दररोज स्वतःला धीर देत जगणें; कठीण होत आहे
किती आवरावें आपणच आपणाला; कठीण होत आहे
भोकांड पसरणाऱ्या मनास थोपटीत झोपवुन येतो
भूसा भरलेलें भोत दिसुनही; थांबणें; कठीण आहे.
तडजोडीत जगावें. जगतों : दररोज कठीण होत आहे
आपलें अस्तित्व असुनही नाकारणें; कठीण होत आहे
समजुन समजावतों, समजावुनही नच मानलों
कोठारांत काडी न पडेल, हमी देणें; कठीण होत आहे.

# दगड

उरावर दगड ठेवून बोलूं नको; बोलवणार नाहीं
सूर तुझे, लय तुझी, तारा तूं पिळल्यास, मी नाहीं

अजून टॉवरवरचा चंद्र कललेला नाहीं
अजून पाय मुडपून लाट निजलेली नाहीं
धडपडत उठलेली नाहीं घरवेडी वर्दळ
अजून चौकीवरचा पहारा बदलला नाहीं

तूं बोलत रहा; सारखी बोलतच रहा प्रिये...
अजून हृदय तृप्त भरून उतूं गेलेलें नाहीं

हं–तर ती संध्याकाळ; कुठेंच दिवा विझलेला नाहीं
शहर वाटे सामसूम जणूं कांहीं घडलेंच नाहीं
लख्खकन् लकाकल्या संगिनी आपणां दोघांवर
पुढें सांग; धागा अध्यांत तोडून जमायचें नाहीं

खूप दूरवर नांगरून पडला आहे उजेड
खुषींत आहे मी; तुझें फूलपण तुला विसरलें नाहीं

उरावर दगड ठेवून बोलूं नको; बोलवणार नाहीं
सूर तुझे, लये तुझी, तारा तूं पिळल्यास, मी नाहीं.

# नायक

तो निघाला तेव्हां त्याचीं पावलें
उजेडाकडे होतीं.
पाठीवर वळ होते तरी त्याची नजर
भविष्याकडे होती.
तांब्यासारखें शरीर होतें त्याचें
उच्चारांत जरब होती.
सूर्य गोंदला होता हातावर
कर्तृत्वाची चमक होती.

तो चालला तेव्हां; इच्छुकांनीं
फुलें उधळलीं होतीं.
एका सभेंत त्यानें कोंडवाड्याची
कहाणी सांगितली होती.
अंगावरच्या जखमा दाखवित त्यानें
प्रतिज्ञा केली होती.
मैदानांतुन राजवाड्यांत वळला तेव्हां,
हातांत ताजीं फुलें होतीं.

अलिकडे ऐकतों; तो बंद आहे
ग्रहणानें घेरलें आहे.
नकार देऊनही हातावरचा सूर्य
घासला जात आहे.
दररोज फरासखान्यावर त्याची
हजेरी लावली जात आहे.
त्याचें दुर्भाग्य पुन्हा त्याच्या वांट्याला
त्यांनीं आणलेलें आहे.

तो मूकाही झाला आहे म्हणतात; बिगूल
मुके कसें होईल ?
हादरवतो भिंती; हृदय भरून आल्यास
असें न होईल तर कसें होईल ?
चितारतो म्हणतात, वाकडातिकडा सूर्य मनुष्यही...
हात थरथरत असल्यास कसें होईल ?
झरोक्यांतुन झिरपणाऱ्या कवडश्यांना गोंजारतो
आधार तेवढाच; तर कसें होईल ?

# सावध

शद्बांनो ! सावध असा; सक्त पहारे बसलेत
तुम्हीं दिलेत चंद्र त्यांच्या डोळ्यांत खुपलेत
सावध हे आशया ! सावध माझ्या बाप्पा !
तूं दिल्या सत्यानें उजेड त्यांचे कलथलेत.

सावध माझ्या हृदया ! भणंग युगांचा तूं
ऐकतों कीं, त्यांनीं साखळदंड शोधलेत
सावध माझ्या सखये ! सावध चिमण्या पिलांनों
फाटकें नेसून तुम्हीं मधुघट जोपासलेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ६५०७० वि. काव्य
क्रमांक १९५० नोंद दि. १६/३/६७

## पावसाळा

तुझा उन्मत्त गडगडाट
हाकवित आणतोस किरमिजी, राखी रंगाचे
गुबगुबीत कळप
ओढतांना आसूड कडाडतोस
उगारतोस गिलोटीन विजेचे,
दुभंगतात तेही; खालचे रस्ते
रोंरावत धावतो पूर गटारावरून, तुंबतात
घरें, रस्ते, फुगतो समुद्र.
वर येतो सगळा दबलेला गाळ
आणि माझ्या डोळ्यांत पेटतो जाळ
आतां ह्या वाटेवरून
दोन पोरांना धरून
ती कशी जाईल?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६७

# कर्जपुत्र

…पुढें काढलें लगीन अमुचें बा बापानेंच
ताशे वाजंत्री वाजलीं मिरवलों कर्जांतच
छान बाहुली शेजारी काळे हुरूपले खांदे
दोघें निस्तरा निस्तरा, झाले जगण्याचे वांदे
थोडें अल्याडपल्याड; इथें रात्र तिथें दिवा
कधीं उसवा अंधार, केव्हां उजेडच शिवा
एका पुण्यरात्रीं आलों एका बेडक्यात मेलों
वर्गणीच्या ताटीवरच गुंडाळून गेलों
पुढें आक्रोशती टाळ मागें आम्ही कर्जपुत्र
पुरे पुरून उरलें कर्ज देते पुण्यवंत
कळों आलें तेराव्यांत पिंडा शिवला न काक…

# विश्वास ठेव

इतका वाईट नाहीं मी; जितका तूं आज समजतेस
दाहक नव्हतें ऊन जितकें तूं आज समजतेस

तडजोड केली नाहीं जीवनाशीं; हे असे दिवस आले
आयुष्यभर स्वागतास पेटते निखारेच सामोरे आले

हारलों कैकदां झुंजींत; तूंच पदराचें शीड उभारलेंस
हताश होवुन गोठलों; तूंच पाठीवर हात ठेवलेस.

कसे जगलों आपण, किती सांगूं, किती करून देवूं याद
पळें युगासम भासलीं; नाहीं बोलवत. नको ती मोजदाद.

अशी उदास, आकुल, डोळ्यांत जहर सांठवित पाहूं नको
आधींच शरमिंदा झालों आहें; अधिक शरमिंदा करूं नको

आयुष्य घृणेंत सरणार नाहीं; हवीच तर घृणाही ठेव
ज्या खडकावर घुसळलीस मान त्या माणसावर विश्वास ठेव.

# विझतां विझतां स्वतःला

झूट बोलून आयुष्य कुणालाही सजवतां येतें
अशीं आमंत्रणें आम्हांलाही आलीं; नाहींच असें नाहीं.

असे किती हंगाम शीळ घालीत गेले घरावरून
शब्दांनीं डोळे उचलून पाहिलेंच नाहीं, असेंही नाहीं.

शास्त्र्यानें दडवावा अर्थ, आम्ही फक्त टाळच कुटावे
आयुष्याचा अनुवादच करा सांगणारे खूप; नाहींत असें नाहीं

असें इमान विकत घेणारीं दुकानें पाड्यापाड्यावर
डोकीं गहाण टाकणारे महाभाग नाहींत असेंही नाहीं.

अशा बेईमान उजेडांत एक वात जपून नेतांना
विझतां विझतां स्वतःला सावरलेंच नाहीं, असेंही नाहीं.

# बोल

ओंठावरचा गोंदलेला उच्चार बोलूं लागेल
तेव्हां तूं कुठें असशील ?
भयाण भयानें हादरून मलाच
आपलेपणानें अडवशील.
कां पुढें करशील तुझ्यामाझ्यामध्यें
उभ्या राहाणाऱ्या ह्या ताज्या फुलांना
आपल्याच अक्षरांना —
काय करशील ?

जन्मभरच्या माझ्या धडपडीला
नकार देशील ?
होकार देशील ?
कां त्याहिपलिकडचीं तुझीं अक्षरें
गोंदशील......
बोल... !

# लालबाग

तुझ्याच कुशीचा आधार घेतघेत
कौलारी छपरांचा आडोसा घेतघेत
ग्रंथ लेनिनचा पठण केला आम्हीं
बंध तोडणारा हातोडा घेतघेत.

मुंबईच्या धमन्या मुठींत घेऊन
वेशीवर येती रणगाडे घेऊन
पर्वतासम खडा ठाकतोस घेऊन
वीजेची पोलादी समशेर घेऊन

कैक शहीदांची कर्मभू लालबाग
सदैव सज्ज बॅरीकेड लालबाग
यंत्राशीं जोडलेला असे जरी हात
दर्द घेऊन झुंजणारा लालबाग

उद्याच्या नभाचा ताराच लालबाग
कैक ऋतुंचा ऋतुराज लालबाग
रस्त्यांत फुलांच्या माळा श्रृंगारून
मरणाला मारून धांवणारा लालबाग

# माणूस

तूं इतकें वाईट वाटून घ्यायला नको होतें
ओठांत आलेच होते शब्द निखारे ओतायचे होते
कां थांबलीस ? कां शिवलेस ओठ ? कां थबकलें पाऊल ?
कोसळणाऱ्या विजेनें असें वळून पाहायला नको होतें.

सहन केलें असतें सारें तुझ्यासाठीं; एक तुझ्यासाठींच
जळलीस रात्रभर; एवढें श्रेय जरूर तुझेंच होतें
फणा पसरून टकमकां पाहात कां राहिली आहेस ?
अशाहि स्थितींत चीड जपलीस एवढेंच मला पुरे होतें.

## माझे शब्द

माझे शब्द तुम्हांला आमची कथा सांगतील
याच सोहळ्यासाठीं दोन अश्रु जपून ठेवलेत.

मिरवीत याल खांद्यावर महाद्वारांतून
केव्हांचे गळ्याखालीं घोष लपवुन ठेवलेत.

विचाराल कुठें आहे तो पहांट शोधणारा
म्हणून गीतांत ओळखीचे सूर ठेवलेत.

फुलारेल माझी कविता, वेडावेल, नाचेल
तिलाही जीवनाचे अर्थ शिकवून ठेवलेत.

खळ्यांतून, मळ्यांतून, ताऱ्यावाऱ्यांतून याल
कुठूनहि यावें; रस्ते मोकळेच ठेवलेत.

शांत दिसलें जरी शहर, गांव, माझा देश,
मुठी वळलेले हात घराघरांत ठेवलेत.

# सांग

आपलेंच घर जेव्हां
आपणासीं वैर धरते
अशावेळीं हे हृदया !
कोठें जावें तेवढें सांग ?

मालवले जातात दिवे
एकापाठोपाठ एक
कोठून आणाव्या ज्योति
हे हृदया तेवढें सांग ?

धक्के मारून काढावा
बिऱ्हाडांतील भाडेकरू
पुन्हां यावें आडोशाला
अशी दैना कां गा सांग ?

# ऊठ–

जीवनापासून पळून जावें तर जावें कुठें ?
आकाशींच्या बापाशीं पहिल्यापासून वैर होतें.
एकट्यानेच गज तोडून उडावें; एवढें बळ कुठें ?
अवघ्या वाटांवर ठायीं ठायीं पहारे होते.

बॉंब मारून बोलवावा असा स्वर्ग आहेच कुठें ?
ज्यासाठीं आमचें आंतडें तिळतिळ तुटत होतें.
ऊठ ! तेवढी ती कोपऱ्यांतली तलवार शोधून ठेव
एकेकाळीं तिच्यावर मीं माझें नशीब घासलें होतें.

# असेल–नसेल

पॅरिसची संध्याकाळ...
घालीत असते बिछान्यावर धुवट चादर
फारतर खिडक्या नसतील तिथें
कातडी गोरी असेल ? स्तनें, जांघा;
फार काय; बाकीचें सगळें तेंच असेल !

इथें...
गोलपिठ्यावरची संध्याकाळ
फारतर खिडक्या असतील इथें
कातडी काळी असेल ?
पान, बिडी, गळ्यांत रंगेल रुमाल असेल ?
पुढचें ... सर्व असेल ?

बिचारा सार्त्र वर्णन करतो
नरक म्हणतो.

असेल, असेल,
सारीच दलदल.

पॅरिसची संध्याकाळ
धुवट चादर वापरीत असेल
कदाचित् इथें तीही नसेल ?

# पोष्टर

चार घरांतील चौघेजण आम्ही
निघतों जेव्हां ...
म्हातारा काळोख खुरडत येतो तेव्हां ...

' हणम्या रे ही शिडी घे,
मी खळ लावतो
डकव वाचलें जाईल अशा ठिकाणीं.
शिंदेची बायको खळ चांगली करते
पण बाप खवीस.
आणि इसल्याची माँ रे !
बडी कडक बाई
नजर बचाके भागा ...
कुत्तेपर पैर पडा ... तो साला और बोंब !

त्या खिडकीपाशीं नको रे डकवूं
कायकुरे
उसकी मैना रहती है ना उधर

सबकी नजर लगेगी तो वांदा...
देख बे इसल्या !
डकवूं कोरे ह्या डगल्यावर
शू ऽऽ... शोर मत कर
तो म्हातारा आला एकेक लावीत अक्षर
बुढा बडा खडूस है !'

चार घरांतील चौघेजण आम्ही परततों जेव्हां...
कुरकुर खांद्यावरची करते कावड
झाडांचीं पानेंही करती बडबड

' इसल्यारे, कल मिटींग चलेगी उधर
मरने दो ! अपनेको साली आती है अब झोंप.
मग मर लेका ह्या शिडीवर
उचलुन तिघेंही नेवूं कब्रिस्तानपर'

' देखरे शिंदे उपरमें चांद का टुकडा
गालीबकी गज़ल सताती है
" बेकार जिंदगीने इसल्याको निकम्मा कर दिया
वर्ना इसल्याभी आदमी था, इश्कके काम आता"
चूप बे इसल्या...खाली पकपक......

' हणम्या रे एक काम करूं या.
— अपना विरोध
वर्गणी जमवूं या.
— अपना विरोध.
इसल्याची शादी बनवूंया...
तो फुल सपोर्ट.
अपने भी घर एक दुल्हन आयेगी
शहनाई बजेगी. '

' ही दुनिया किती पुढे गेली रे;
थोडीसी नाकके आगे
पीछे बुढवाकी नजर
म्हणून म्हणतो इसल्या—
बुढ्यासाठीं चष्मा घेवूं लवकर
आयडिया ! '

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५६५
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ७५०७०
काव्य
१९५०
१६।३।७९
REFBK-0015565
REFBK-0015565